ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २९ नोव्हेंबर, १९५० अंक ४५

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

प्रयत्न करणारानें उमेद न सोडतां कार्य यशस्वी करावें
याकरितां

## हत्ती गेला, शेंपूट राहिलें!

अशी म्हण पडली असावी

★ मशिनरी ३६ लक्ष रुपये, उभारणी ११ लक्ष रुपये, एकूण ४७ लक्ष रुपये ★

★ ४३ लक्ष रुपये मिळाले : ४ लक्ष रुपये राहिले ★

उभारणीचें काम सुरू आहे, मेसर्स स्कोडा कंपनीचे यंत्रविशारद (ERECTORS) यंत्राच्या उभारणीकरितां येणार आहेत.

**मार्च १९५१ ला मशिनरीची उभारणी पूर्ण होईल असा अंदाज आहे.**

**कार्तिकी यात्रेनंतर पहिल्या मशिनरीनें साखर करण्यास सुरुवात होईल.**

★ ठेवींची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★

मुदतीच्या ठेवीचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

पुणें, ता. १६-११-१९५०.
कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मीरोड,
१८० सदाशिव पेठ, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंटस्.

## दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स
## मशीन टूल्स

**कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.**

या मालाबद्दल आमच्याकडे चौकशी करण्यास विसरूं नका.

**केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**


# विविध माहिती

**बँकांच्या वेळांतील कपातीबद्दल तक्रार—** मुंबई शेअर बाजाराच्या सेक्रेटरीनें भारत सरकारला व रिझर्व्ह बँकेला एक निवेदन सादर केलें आहे. बँकांच्या कामाच्या वेळांत जी कपात करण्यांत आली आहे, तीबद्दल ह्या निवेदनांत तक्रार केली आहे. कामाच्या वेळांत कपात झाल्यामुळें ठेवीदारांची गैरसोय होते, ठेवींवरील व्याज कमी होतें, कर्जाची मुदत वाढविली जाऊन सावकारांची जोखीम वाढते, इ. मुद्दे निवेदनांत स्पष्ट करण्यांत आले आहेत. १९४२ मध्यें दर आठवड्याला बँकांचे तास ३१ होते, ते १९५० मध्यें १८½ झाले असल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. लंडनमध्यें २७½ तासांचे आणि न्यूयार्कमध्यें ३० तासांचे आठवडे आहेत.

**प्राप्तीवरील कर किती चुकविला ?—** प्राप्तीवरील कराबाबत नेमलेल्या चौकशी कमिशननें गेल्या १५ महिन्यांत १० कोटी, २५ लाख रुपये कर चुकविलेलें उत्पन्न उघडकीस आणलें. त्यापैकीं ४ कोटी रुपये उत्पन्नासंबंधीं तडजोड करण्यांत आली. २ कोटी रुपये उत्पन्नासंबंधीं तडजोड होऊं न शकल्यानें त्यावरील कराची आकारणी दंडासहित करण्यासाठी सर्व प्रकरणें खात्याकडे पाठविण्यांत आलीं. कमिशनकडे एकूण १३४१ प्रकरणें सोपविण्यांत आलीं होतीं. धंद्यावारी त्यांची वाटणी १८८ गटांत होत होती. त्यापैकीं ५० गटांतील ३२५ प्रकरणें निकालीं काढण्यांत आलीं. ७५ टक्के प्रकरणांत कर–चुकारांनीं उत्पन्न लपविल्याचें कबूल केलें. २५ टक्के प्रकरणीं कबुली देण्यांत आली नाहीं; परंतु कर चुकविल्याचा उघड पुरावा हातीं होता. एकही प्रकरण असें नव्हतें कीं, ज्यांत लबाडी अगर कर–चुकारपणा आढळला नाहीं.

**दमण स्टेशन आणि दारूबंदी—** मुंबई सरकारनें रेल्वे बोर्डाला अशी विनंति केली होती कीं 'धावती राणी' आणि 'सौराष्ट्र एक्सप्रेस' ह्या गाड्या दमण स्टेशनावर उभ्या करण्यांत येऊं नयेत. मुंबई सरकारचें म्हणणें असें होतें कीं, ह्या गांवीं जाऊन लोक दारू पितात. दमणला जाणाऱ्या व येणाऱ्या वहातुकीचा विचार करता, मुंबई सरकारची ही विनंति मान्य करतां येत नाहीं असें बोर्डानें कळविलें आहे.

**तिबेटमध्यें रशिअन भूगर्भशास्त्रज्ञ—** तिबेटमध्यें शिरलेल्या चिनी लष्कराबरोबर रशिअन भूगर्भशास्त्रज्ञांचें एक पथकही आहे, असें समजतें. तिबेटच्या खनिज संपत्तीचें संशोधन हें पथक करणार आहे. मास्कोमधील एक प्रसिद्ध शास्त्रज्ञ ह्या पथकाचा पुढारी आहे.

**खेळांच्या साहित्याचा धंदा—** भारताची फाळणी होण्यापूर्वी खेळाचें सामान तयार करण्याचा धंदा पंजाबांत भरभराटीला होता. ह्या धंद्याला पहिल्या महायुद्धानंतर प्रथम सुरवात करण्यांत आली. १९३९ सालच्या सुमारास धंद्यांत १ लाख कामगार काम करीत होते. हॉकीच्या काठ्या, टेनिसच्या बॅटी आणि क्रिकेटचे चेंडू हा माल फार चांगल्या प्रतीचा मोठ्या प्रमाणावर तयार होऊं लागला होता. पंजाबमधील काश्मीरच्या आसपासची मलबेरीची झाडें आणि शीख कारागिरांचें कौशल्य ह्यांच्या संयोगामुळें हा धंदा चांगला पोसला गेला होता. फाळणीनंतर मात्र धंद्याची वाताहात झाली.

**भारतासाठी नवीन ट्रॅक्टर्स—** भारताच्या अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेसाठी १२० फार्ग्युसन ट्रॅक्टर्स नुकतेच मुंबईला आयात करण्यांत आले. असे ट्रॅक्टर्स तयार करण्याचा एक कारखाना लवकरच मद्रासला उघडण्यांत येणार आहे. यंत्रचलित नांगराबरोबर वापरण्याचीं दोन–तीन प्रकारचीं अवजारेंहि ह्या कारखान्यांत तयार करण्यांत येणार आहेत.

**पंजाब नॅशनल बँक—** पंजाब नॅशनल बँकेच्या सांगली येथील शाखेत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट सुरू करण्याचा समारंभ नुकताच पार पडला.

**मद्रास सरकारच्या पाटबंधाऱ्यांच्या योजना—** मद्रास राज्याच्या सध्याच्या मंत्रिमंडळानें पाटबंधाऱ्यांच्या दोन योजना मंजूर केल्या आहेत. ह्या योजना मंत्रिमंडळाच्या अन्न कमिटीनें शिफारस केलेल्या आहेत. दोन्ही योजनांना मिळून सुमारें ६ लाख रु. खर्च येईल आणि त्यामुळें मद्रास राज्यांतील अन्नधान्यांचें उत्पादन १००० टनांनीं वाढेल असा अंदाज आहे. योजनांचा फायदा वेलोर आणि गुंटूर ह्या जिल्ह्यांना मिळणार आहे.

**गव्हाच्या निर्यातीस बंदी ?—** पाकिस्तान सरकारच्या अन्न खात्यानें सरकारला असा सल्ला दिला आहे कीं, तूर्त कांहीं काळ कोणत्याही परदेशाकडे गव्हाची निर्यात करण्यांत येऊं नये.

**पाकिस्तानच्या उद्योगधंद्यांना संरक्षण—** पाकिस्तानांतील उद्योगधंद्यांना संरक्षण देण्यांत यावें अशी शिफारस पाकिस्तानच्या टॅरिफ कमिशननें केली होती. ह्या शिफारसीप्रमाणें पाकिस्तानच्या घटना समितीनें संरक्षक जकाती बसविण्यास परवानगी देणारें बिल नुकतेंच मंजूर केलें.

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्सची प्रगति—** ३१ मार्च, १९५० रोजीं संपलेल्या वर्षांत किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि. ह्या कंपनीला ९५,७३७ रु. तोटा झाला. गेल्या वर्षी कंपनीला ७६,८९३ रु. तोटा झाला होता. परंतु चालू सालचा तोटा हा १९४९ च्या एप्रिल ते जून पर्यंत एंजिन्सची विक्री न झाल्यामुळें आलेला आहे. आतां कारखान्याचा खर्च आणि उत्पन्न ह्यांची बरोबरी झाली असून पुढील वर्षी कंपनी भरीव प्रगति करील असें वाटतें.

**भांडवल द्यावें, पण ?—** पाकिस्तानचे अर्थमंत्री मि. गुलाम महंमद ह्यांनीं मुसलमान राष्ट्रांना असा सल्ला दिला आहे कीं राजकीय अटींचीं बंधनें स्वीकारून परकीय भांडवल घेण्यापेक्षां आपलें स्वतःचेंच भांडवल उभारणें चांगलें, मग ह्या कामीं वेळ लागला तरी परवडेल.


—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

अर्थ

बुधवार, ता. २९ नोव्हेंबर, १९५०



संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

## चार बंगाली बँकांचें एकत्रीकरण

### युनायटेड बँक ऑफ इंडियांत रूपांतर

६ नोव्हेंबर १९५० रोजीं पश्चिम बंगालमधील चार शेड्यूल्ड बँकांचें एकत्रीकरण घडून आलें ही गोष्ट हिंदी बँकिंगच्या इतिहासांत महत्त्वपूर्ण अशीच झाली. कॉमिल्ला बँकिंग कार्पोरेशन लि., कॉमिल्ला बँकिंग युनियन लि., बेंगॉल सेंट्रल बँक लि. आणि हुगळी बँक लि. ह्या चार बँकांच्या विशेष साधारण सभांनीं त्या एकत्रीकरणास मान्यता दिली, आणि त्या चार बँकांची एक मोठी युनायटेड बँक ऑफ इंडिया लि. बनली. ३१ डिसेंबर, १९४९ रोजीं काढलेल्या चारहि बँकांच्या ताळेबंदांचे आधारावर एकत्रीकरणाची योजना आखलेली आहे. युनायटेड बँक ऑफ इंडियाचें वसूल भांडवल २ कोटी, ६४ लक्ष रु. झालें असून रिझर्व्ह फंडांत १ कोटी, १९ लक्ष रुपये आहेत. ठेवींची रक्कम ३२ कोटी रुपये भरते. सरकारी व इतर रोख्यांत १५ कोटी रुपये, दिलेलीं कर्जें १६ कोटी रुपये, रोख शिल्लक ५ कोटी, ५२ लक्ष रुपये असे इतर आंकडे आहेत. म्हणजे, दिलेलीं कर्जें ठेवींच्या ५०·८% असून रोख शिलकेचें ठेवींशीं प्रमाण १७·५% आहे. १९४९ मध्यें चारहि बँकांना मिळून ३७ लक्ष, ५७ हजार रुपये नफा झाला होता. इंपिरिअल बँक वगळली, तर हिंदी शेड्यूल्ड बँकांत युनायटेड बँक ऑफ इंडियाचा अनुक्रम तिसरा लागत आहे.

कॉमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन लि. व न्यू स्टँडर्ड बँक लि. ह्यांचें १९४६ मध्यें एकत्रीकरण झालें, तेव्हांपासून व्यापक स्वरूपाच्या एकत्रीकरणाची भाषा सुरू झाली होती. परंतु, त्या संबंधांतील रिझर्व्ह बँकेकडे पहिलें पत्र १४ डिसेंबर, १९४८ रोजीं पाठविलें गेलें. एकत्रीकरणाच्या मार्गांतील अडचणी दूर करण्यासाठीं हिंदी पार्लमेंटांत कायदा सुधारावा लागला, त्यास आठच महिने झाले. कायद्याच्या अनेक अडचणी दूर करतां करतां अखेर ६ नोव्हेंबरचा दिवस उजाडला. घटक बँकांनीं गेलीं २०-३० वर्षें अनेक संकटांतून मार्ग काढलेला आहे आणि प्रत्येकीनें आपआपल्या पद्धतीनें बँकिंगचा प्रसार केलेला आहे. त्या सर्वांचा अनुभव आतां एकत्रित होत आहे. ह्या एकत्रीकरणासाठीं कित्येकांना स्वार्थत्याग करावा लागला आहे, परंतु त्यामुळें निर्माण होणारी भक्कम संस्था किती तरी अधिक पटीनें उपयुक्त कामगिरी बजावूं शकणार आहे. बँकिंगवरील बंगालमधील जनतेचा विश्वास दृढ होण्यास त्यामुळें मदत होणार आहे.

एकत्रित झालेल्या बँकांपैकीं सर्वांत ज्यास्त ठेवी (११·४५ कोटी रु.) कॉमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशनच्या असून कॉमिल्ला युनियनच्या ९·४८ कोटी रु., बेंगाल सेंट्रलच्या ७·७५ कोटी रु. व हुगळी बँकेच्या २·२९ कोटी रु.च्या आहेत. रिझर्व्ह फंडाचे बाबतींतहि कॉमिल्ला बँकेसच अग्रस्थान आहे. हुगळी बँकेच्या भागीदारांना एकत्रीकरणाचा विशेष फायदा होईल, हें उघडच आहे.

कॉमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशनचे चेअरमन, श्री. एन. सी. दत्त ह्यांनीं आपल्या बँकेच्या भागिदारांच्या अखेरच्या सभेंत भाषण करतांना एकत्रित झालेल्या बँकेला सुयश चिंतिलें, त्याबरोबरच स्वतंत्रपणें व्यवसाय करणाऱ्या इतर अनेक बंगाली बँकांचीहि अखंड प्रगति होवो, अशी इच्छा प्रदर्शित केली. लहान आकार असणें हा दोष नसून, व्यवसाय समाजाच्या किंवा प्रत्यक्ष संस्थेच्या हितास बाधक करणें हा दोष होतो, असें त्यांनीं सांगून बंगाली बँकिंगचा व्यवसाय समाजाच्या हितास पोषक होतो, असें सांगितलें. चार शेड्यूल्ड बँकांचें एकत्रीकरण करणें ज्या कारणांमुळें आवश्यक झालें, तीं लक्षांत घेतलीं असतां श्री. दत्त ह्यांच्या उद्‌गारांचें रहस्य सहज पटेल.

## १९४९ मधील विजेचें उत्पादन व खप

### खेडेगांवांतून मंद गतीनें प्रसार

टाटा हैड्रो सिस्टिममधील एक जनरेटर बिघडल्यामुळें आणि मेटुर धरणांतील पाणी आटल्यामुळें १९४९ मध्यें विजेच्या उत्पादनांत व्यत्यय आला, तरी सुद्धां एकूण उत्पादन वाढलेलेंच आढळतें. १९३९ अखेर उभारलेल्या यंत्रांची एकूण उत्पादनक्षमता १०,७०,००० कि. वॅ. होती, ती १९४८ अखेर १४,११,००० कि. वॅ. वर गेली. एकूण उत्पादनक्षमतेंत वाफेवर चालणाऱ्या यंत्रांचा हिस्सा ५५·५% आहे; जलशक्तीवर चालणाऱ्या यंत्रांचा वाटा ३६·४% आहे.

१९४९ मध्यें उत्पादनक्षमता ८·९% नें सुधारली, तरी प्रत्यक्ष उत्पादन मात्र ७·३% वाढलें. म्हणजे, तें ४,९०,९०,००,००० युनिटस झालें. विजेच्या एकूण खपापैकीं ६४·१% वीज कारखान्यांनीं घेतली आणि ११·८% वीज घरगुती वापरासाठीं खर्च झाली. वहातुकीसाठीं ७.५% वीज खर्च झाली.

विजेच्या खपाच्या दृष्टीनें गिरण्यांचा अनुक्रम खालील प्रमाणें लागतो:—

| | १९४९ मधील खप |
|---|---|
| कपास-कापड | १,१२,८०,००,००० युनिटस |
| लोखंड, पोलाद | ५०,५०,००,००० ,, |
| ताग | २८,३०,००,००० ,, |
| खाणी | २४,४०,००,००० ,, |
| सिमेंट | २४,००,००,००० ,, |

विजेचें उत्पादन आणि खप ह्यांत वाढ दिसत असली, तरी खेडेगांवांतून विजेचा प्रसार फारच मंद गतीनें होत आहे. ५,००० पेक्षां कमी वस्ती असलेल्या एकूण ५,५९,०६२ खेड्यांपैकीं फक्त २,११८ खेड्यांस विजेचा लाभ झाला आहे. ह्याउलट ५०,००० वरील वस्तीच्या एकूण १३६ शहरांपैकीं १३५ शहरांस वीज मिळाली आहे.

**मधमाशा पाळण्याचा धंदा**—उत्तर भारतांत मधमाशा पाळण्याच्या धंदाला उत्तेजन देण्यासाठीं एक संघटना स्थापन करण्यांत आली आहे. खेडेगांवांतून हा धंदा दुय्यम धंदा म्हणून करतां येण्यासारखा असतो.

## अमेरिकन बँकांचें आपुलकी निर्माण करण्याचें धोरण

### जनतेला आकर्षण्यासाठी सोयी व आकर्षणें

भारतांत बँकिंगचा प्रसार खेडेगांवांतून कसा करतां येईल ह्याबद्दल बरीच चर्चा चालू आहे. सामान्य जनतेला बँकेबद्दल आपलेपणा वाटून ती आकर्षिली गेली पाहिजे आणि तिचा विश्वास संपादन केला पाहिजे. बँक ऑफ पतियाळानें फिरत्या मोटारींच्या बँकिंगचा उपक्रम सुरू केला आहे. ह्या प्रयोगाकडे हितसंबंधीयांचें लक्ष वेधून राहीलच. ब्रिटिश बँकांमध्यें परस्पर स्पर्धेचा अभाव असल्यामुळें, त्यांना गिऱ्हाईक आकर्षण्यासाठी मुद्दाम प्रयत्न करण्याची आवश्यकता वाटत नाहीं. त्याचप्रमाणें तेथील जनतेंत बँकिंगची सवयहि दृढमूल झालेली आहे. बँकिंगच्या संस्थेविषयीं प्रतिकूल मत न होता, तिचेबद्दल आदर तर वाढावा परंतु संस्थेचा प्रचार व्हावा, ह्या दृष्टीनें योजना आखून ती यशस्वी करणें हें अवघड काम आहे. अमेरिकन बँका तेथील परिस्थितीमध्यें कोणत्या प्रकारें आपल्या गिऱ्हाइकांची सेवा करीत आहेत व आपलें कार्य करीत आहेत, ह्याच्या माहितीवरून आपल्या बँकांनाहि कांहीं कल्पना सुचूं लागतील. ह्या दृष्टीनें खालील हकीकत उद्बोधक वाटेल.

ग्रेट ब्रिटनमध्यें थोड्याशा परंतु प्रचंड बँकांच्या शेकडो शाखा आहेत. अमेरिकेंत बँकिंगची अशी पद्धति नाहीं. तेथें फार पुष्कळ शाखा असलेल्या फारच थोड्या बँका आहेत. ग्रेट ब्रिटनमधील बड्या पांच बँकांच्या प्रस्थाप्रमाणें तेथें प्रस्थें नाहींत. ह्या फरकाचें प्रत्यंतर त्यांच्या कार्यपद्धतींतहि दिसून येतें. ब्रिटिश बँका आपला 'दर्जा' राखण्याचा प्रयत्न करीत असतात; गिऱ्हाइकें आकर्षणाची खटपट करणें त्यांना इष्ट वाटत नाहीं. अमेरिकेंत मात्र इतर दुकानदार आणि बँका ह्यांच्यामध्यें गिऱ्हाइकें आकर्षण्याच्या बाबतींत कांहींच फरक आढळत नाहीं.

लहान गांवांतील अमेरिकन बँकांतून मोटरवाल्या खातेदारांच्यासाठी खास सोय केलेली असते. मोटारींतून त्यांना उतरावें न लागतां त्यांना चेक भरणें किंवा चेक वटवणें हीं कामें करतां येतात. मोटारीच्या सीटवर बसून हात पोचूं शकेल अशा रीतीनें कॅशरच्या खिडक्या बसविण्यांत येतात. जास्त वस्तीच्या शहरांतून हें अशक्य असतें, परंतु तेथेंहि रस्त्याच्या कडेला अशी व्यवस्था केलेली असते. जमिनीखालीं खोली तयार केलेली असते त्यांत कॅशिअर बसतो. त्याच्याकडे कागद पोचविण्याची सोय एका पोकळ खांबांत उतरंड करून केलेली असते. मोठ्या पोस्ट ऑफिसांतील उताराच्या पेटीप्रमाणेंच ही व्यवस्था असते. पेरिस्कोपच्या सहाय्यानें तळघरांतील कॅशर गिऱ्हाइकास प्रत्यक्ष पाहूंहि शकतो. मोटारवाल्यानें मोटारींतून खालीं उतरण्याचें कारणच नसतें. कांहीं बँका मोटारवाल्यांच्या मोटारींसाठी पार्किंगच्या जागा घेऊन ठेवतात. त्यामुळें मोटारवाले बँकेंत येऊन घाई न होता आपलें काम करूं शकतात "बँकेच्या गिऱ्हाइकांसाठी पार्किंगची सोय—१०,००० डॉलर्स" अशा नोंदी बॅलन्सशीटमध्यें आढळतात. बाबागाड्यांतून मुलांना घेऊन जाणाऱ्या मातांसाठींहि अशीच सोय केलेली असते.

कचेरींतील आंतील व्यवस्था कार्यक्षमतेच्या दृष्टीनें आखलेली असते. प्रत्येक प्रकारच्या कामासाठी बँक किती कमिशन आकारील ह्याची तपशीलवार यादीच छापून ठेवलेली असते. बँकेनें कांहीं कमिशन डेबिट टाकावयाचें आणि गिऱ्हाइकानें मागून त्याबद्दल वाद घालत बसावयाचें, ही सर्वांच्या नित्याच्या परिचयाची गोष्ट अमेरिकेंत आढळणार नाहीं. अंधळ्या खातेदारांसाठीं कांहीं बँकांनीं 'ब्रेल' चेक सुरू केले आहेत. खातेदारांचीं स्वतःचीं नांवें छापलेले चेक बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आढळतात. फक्त गिचमीड सही असलेल्या चेकपेक्षा हे चेक बँकांना अधिक सोईस्कर वाटतात आणि खातेदारासही अशा चेकमुळें मोठेपणा वाटतो. अमेरिकन बँका चेक बुकें मोकळेपणानें देतात. केवळ चेकबुक जवळ असणें हें प्रतिष्ठेचें चिन्ह नाहीं, इतकेंच नव्हे तर चेक बुक बाळगणाराचें तेथील बँकेंत खातें असेलच असेंहि सांगतां येणार नाहीं.

१९४५ पासून अमेरिकन बँकांत ५ दिवसाचा आठवडा सुरू आहे. परंतु तो सर्वच बँकांतून आढळत नाहीं. पांच दिवसांचा आठवडा सुरू होतांच बँकांनीं रोजचे कामाचे तास वाढवून खातेदारांची गैरसोय टाळली आहे, आणि नोकरांना काम पांच दिवस पडलें तरी बँका मात्र सहा दिवस उघड्या ठेवण्यांत येत आहेत. ह्या बाबतींतहि, इतर गोष्टीप्रमाणेंच बँका-बँकांत फरक आहे. एक बँक रोज संध्याकाळीं ५ पर्यंत उघडी राहील तर दुसऱ्या ठिकाणची बँक रात्रीं १० पर्यंत काम करील. कांहीं बँकांची कांहीं खातीं इतर कामें बंद झाल्यावरहि चालू रहातील. नोकरांच्या पाळ्या योग्य प्रकारें बदलून हें सर्व साधतां येतें.

ब्रिटिश बँकांपेक्षां अमेरिकन बँका तरुणांना आकर्षण्याचा अधिक कसोशीनें प्रयत्न करतात आणि त्यासाठी शाळांचें सहकार्य घेण्यांत येतें. शाळांतून बचतीच्या मोहिमा काढण्यांत येतात, बँकेच्या देखरेखीखालीं शाळांत मुलांचे करवीं त्यांचीच लहानशी बँक चालविली जाते, शैक्षणिक चित्रपट दाखविले जातात, शाळांतील वर्ग बँकेंत नेऊन बँकांचें काम त्यांना दाखविण्यांत येतें आणि कांहीं बँकांनीं लहान मुलांच्यासाठी खास खिडक्या ठेवल्या आहेत. खिडकीपर्यंत त्यांचें तोंड पोचावें म्हणून पायऱ्या केल्या आहेत. सामान्य जनतेसहि वेळोवेळीं बँकेंत पाचारण करून त्यांना आंतील व्यवस्था आणि तळघरेंहि दाखविलीं जातात. एकादी बँक आपल्या आवारांत फुलांचें प्रदर्शन भरविते किंवा आपल्या जागां स्थानिक उद्योगाच्या प्रदर्शनासहि देते. जनतेमध्यें बँकेबद्दल आपुलकी निर्माण करून, बँक ही नेहमी लोकांच्या नजरेसमोर ठेवणें हा त्यांत हेतू असतो.

जी गोष्ट लहान बँक सहज करू शकते, तीच गोष्ट शेकडो शाखा असलेली बँक करूं शकत नाहीं, ह्यामुळेंच ग्रेट ब्रिटनमधील बँका जें करूं शकणार नाहींत तें अमेरिकन बँका करूं शकतात. अमेरिकन बँकेच्या कचेरींतील देखावा नेहेमींच उत्साहकारक असतो. पाऊस पडूं लागल्यावर आपल्या खातेदारास तेथील बँका परतीच्या बोलीवर परंतु कांहींहि आकार न घेतां छत्र्या पुरवितात ! जिन्यांतून वर जात असतांना गाणें चालू असतें. बाहेर मुलें ठेवण्याची सोय असते, त्याचप्रमाणें ट्रॅक्टर्सहि तेथें येऊन उतरतात. हप्तेबंदीच्या खरेदीच्या करारांत बँकांचा बराच संबंध येतो.

शुभ प्रसंगासाठी जशीं तारेचीं खास शोभिवंत कागद-पाकिटें असतात, त्याचप्रमाणें कांहीं अमेरिकन बँका खास प्रसंगांसाठीं योग्य असे खास चेक्स देतात. वाढदिवस, पदवी प्राप्ती किंवा विवाह ह्या प्रसंगांस अनुरूप असे शोभिवंत चेक्स असतात. त्यामुळें, देणगी देणाराचा आणि घेणाराचा आनंद वाढतो आणि बँकेचाहि अप्रत्यक्ष फायदा होतोच. अमेरिकन बँकांचे हे उपक्रम कांहीं बाबतींत तरी हिंदी बँकांना अनुकरणीय ठरतील, ह्यांत संशय नाहीं. हिंदी सामान्य मनुष्याच्या विचारांची ठेवण लक्षांत घेऊनच, अर्थात ह्या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे. ("विद्याविलास", १०-११-५० मध्यें श्री. वा. काळे ह्यांचा प्रसिद्ध झालेला लेख).

## महाराष्ट्रावर लक्ष्मीची कृपा केव्हां होईल ?

श्री. संपादक यांसी—

दि. २५ ऑक्टोबरच्या अंकातील श्री. चितळे यांचा वरील लेख वाचला. त्यांनी अर्थसाधनेकरितां लागणाऱ्या गुणावगुणांची चर्चा व सद्य:स्थितीचें वर्णन केलें तें साधारणत: मान्य होण्या-सारखें आहे.

तथापि, लेख वाचनानंतर मनांत आलेले विचार असे: महाराष्ट्रीय अधिक कृतिशून्य आणि वाचाळ आहे का! तो कमी अंतर्मुख आहे का? तो व्यवतीचे देव्हारे अधिक मिरवितो का? त्याच्या व्यवहारांत सचोटी कमी असते का? आवा पाहून खर्च करण्यांत तो इतरांपेक्षां कमी लक्ष देतो का? आणि महाराष्ट्रीयांत नसलेले किंवा अल्पस्वल्प असलेले लेखांत वर्णिलेले बहुमूल्य गुण आंवतीं-भोंवतीं दिसणाऱ्या आजच्या इतर लक्ष्मीधरांत विशेषत्त्वानें आढळतात, असें कां आहे?

श्री. चितळे व इतर विचारवंत यांनीं महाराष्ट्राच्या दारिद्र्याची अधिक सखोल आणि विस्तारानें चिकित्सा करावी व आपण तिला प्रसिद्धी द्यावी ही विनंति. —विवेक परदेशी.

### डेक्कन ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज लि. ची पुनर्घटना : हायकोर्टाची मान्यता

उसाची लागवड व साखरेचें उत्पादन करण्यासाठी वरील कंपनी पुणें येथें स्थापन झाली होती. तिचें अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल १० लक्ष रु. होतें. मे. चिवटे, मुतालिक आणि कं.कडे तिची मॅनेजिंग एजन्सी होती. कंपनीनें हायकोर्टाकडे कंपनी कायद्याच्या १५३ व्या कलमाप्रमाणें पुनर्घटनेच्या मंजुरीसाठी अर्ज केला. सुचविलेल्या पुनर्घटनेंत थोडा फेरफार केला जाऊन तिची योजना हायकोर्टानें गेल्या आठवड्यांत मंजूर केली.

### कंत्राटी मजुरांनाहि बोनस दिला पाहिजे

महाराष्ट्र शुगर मिल्सच्या कंत्राटी मजुरांनी १९४७—४८ सालाकरितां सहा महिन्यांच्या बोनसची मागणी केली होती. सरकारनें हा प्रश्न इंडस्ट्रियल कोर्टाकडे सोंपविला व कोर्टानें त्या वर्षांतील मूळ मजुरीच्या तीन अष्टमांश एवढा बोनस दिला पाहिजे, असा निवाडा केला. कंपनीनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें. तेव्हां न्या. भगवतींनीं हा निवाडा फिरविला. "कंत्राटी मजूर एम्प्लॉईच्या व्याख्येंत बसत नाहींत, तेव्हां औद्योगिक वांधा उपस्थित होतच नाहीं असें त्यांनीं सांगितलें. परंतु सरन्यायाधीश व न्या. गजेंद्रगडकर यांनीं न्या. भगवतींचा निवाडा रद्द करून इंडस्ट्रियल कोर्टाच्या निवाड्याप्रमाणें बोनस दिला पाहिजे असा हुकूम केला. "कंत्राटी मजूर एम्प्लॉईच्या व्याख्येंत येतात" असा त्यांचा अभिप्राय आहे. कंपनी सुप्रीम कोर्टाकडे अपील करणार आहे.

### दि आदर्श कृषि संस्था लि., नवमही, धुळें

वरील कंपनीचें खेळतें भांडवल गेल्या वर्षीं वाढून तें ५२,५४० रु. चें ५८,६८० रु. झालें. चालू वर्षअखेर तें १,००,००० रु. वर नेण्याची डायरेक्टरांची अपेक्षा आहे. अहवालाचे वर्षीं सुपरविझन चार्जेस, विक्रीवर कमिशन, मिळालेलें डिव्हिडंड, इ. रूपानें संस्थेस १०,१८२ रु. उत्पन्न होऊन निव्वळ नफा १,९०८ रु. उरला. कंपनीचें वसूल भांडवल १३,९५० रु. असून तिचेकडे ३३,४७५ रु. च्या ठेवी आहेत. कंपनीनें ८% दरानें डिव्हिडंड जाहीर केलें आहे.


## The Brihan Maharashtra Sugar Syndicate Ltd., Poona 2.

## NOTICE

The Sixteenth Annual General Meeting of the Share-holders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate Ltd., Poona 2, will be held on Sunday, the 31st December 1950, at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business :—

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited statements of Accounts for the year ended 30th September 1950.

(2) To sanction the payment of a Dividend for the above-mentioned period.

(3) To elect Directors in place of those who retire but are eligible for re-election.

(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By Order of the Board of Directors,

Poona 2, 25th Nov. 1950. } C. G. Agashe & Co. Managing Agents.

*Note* :—The Transfer Books of the Company will be closed from 16th December, 1950 to 7th January, 1951 (both days inclusive). The Dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtaa Ltd., Poona 2, on and after the 7th of February 1951.



## महाराष्ट्र सहकारी विद्यालय

### पुणें १

या विद्यालयाचे वर्ग ता. २ जानेवारी १९५१ पासून नं. ५ बैरामजी जिजिभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को. ऑफिसर, खरेदी विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठी विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ डिसेंबर १९५० च्या आंत अर्ज करावे.

बा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.


### दि बेलापूर कंपनी लि.

वरील कंपनीनें ३० सप्टेंबर, १९५० अखेर संपलेल्या वर्षीं १,१२,०५,६५६ रु. ची साखर विकून ३३,४५,५८१ रु. नफा मिळविला. १४ लक्ष रुपयांची कराची तरतूद करून १९,४५,५८१ रु. ताळेबंदाकडे नेण्यांत आले. मॅनेजिंग एजंटसना ऑफिस अलावन्स व कमिशन मिळून ४,५९,३२७ रु. मिळाले. भागीदारांना प्रत्येक भागावर १२ रु. ८ आ. करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चात मिळेल असे फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधि पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | १-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

फोनः ३४५११ तारः SAHYOG

दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१८,२६५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७१,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

## गेल्या पांच वर्षांतील टॅरिफ बोर्डाची कामगिरी

इंडियन टॅरिफ बोर्डानें २ नोव्हेंबर १९५० ला संपलेल्या पांच वर्षांच्या काळांत ६० धंद्यांस संरक्षण वा मदत देण्याच्या मागणीची चौकशी करून साखर, सुती कापड, लोखंड व पोलाद, कागद व कृत्रिम रेशीम वगैरे जुन्या धंद्यांस संरक्षण चालू ठेवण्याच्या प्रश्नाचीही तपासणी केली.

त्याचप्रमाणें बोर्डानें सुती कापड, लोखंड व पोलाद आणि कागद यांसह युद्धपूर्व काळांतील ५ प्रमुख धंद्यांत तयार करण्यांत आलेल्या वस्तूंच्या किंमती ठरविण्यासाठीं जाहीर चौकशी केली.

टॅरिफ बोर्डानें एकूण १०० हून अधिक चौकशा करून उत्पादक, आयातदार, ग्राहक व व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी यांना आपापलीं मतें मांडण्याची संधि दिली. संरक्षण देण्याची शिफारस करतांना बोर्डानें नेहमीं ग्राहकांच्या हितसंबंधाकडेहि लक्ष दिलें.

भारत सरकारच्या ३ नोव्हेंबर १९४५ च्या ठरावानुसार बोर्डाची स्थापना करण्यांत आली. त्यावेळीं सर षण्मुखम् चेट्टी अध्यक्ष होते. श्री. सी. सी. देसाई, आय. सी. एस., डॉ. नझीर अहमद व डॉ. एच. एल. डे इतर सभासद म्हणून होते. या नेमणुका दीर्घकालीन मुदतीचें जकातविषयक धोरण ठरून त्याची अंमलबजावणी करणारी कायमची यंत्रणा नेमून होईपर्यंत प्रथम २ वर्षांकरितां करण्यांत आल्या.

या बोर्डाची स्थापना सुरवातीला मुख्यतः युद्धकाळांतील धंद्यांच्या मागणीबाबत चौकशी करण्यासाठीं झाली होती. तरी भारत सरकारनें जानेवारी १९४७ मध्यें कांहीं जुन्या धंद्यांस संरक्षण चालू ठेवावें किंवा नाहीं या प्रश्नाची चौकशी करण्याचा अधिकार बोर्डास दिला. या धंद्यांस मिळणारें संरक्षण ३१ मार्च १९४७ ला संपणार होतें. त्यानुसार ऑक्टोबर १९४७ मध्यें श्री. गगनविहारी मेहता अध्यक्ष, डॉ. एच. एल. डे व डॉ. व्ही. व्ही. नारायणस्वामी नायडू सभासद, याप्रमाणें बोर्डाची पुनर्रचना करण्यांत येऊन त्याची मुदत नोव्हेंबर १९४७ पासून आणखी ३ वर्षांनीं वाढविण्यांत आली.

सरकारच्या प्रत्यक्ष प्रोत्साहनानें युद्धकालांत झालेल्या, त्याचप्रमाणें खाजगी पुढाकारानें व सहाय्यानें वाढलेल्या व युद्धकालांत राष्ट्रीय अर्थकारण टिकवून धरण्याचे कामीं साह्य करणाऱ्या धंद्यांस संरक्षण किंवा मदत देण्याच्या मागणीची चौकशी करणें हें बोर्डापुढील काम होतें.

टॅरिफ बोर्डाच्या सध्याच्या चौकशीच्या विषयांनुसार बोर्डाला एखादा धंदा संरक्षण किंवा मदत देण्यास पात्र आहे कीं नाहीं याची चौकशी करून त्यावर आपला अहवाल तयार करावा लागतो. या विषयानुसार १९२१–२२ च्या फिस्कल कमिशननें संरक्षणास पात्र ठरण्याच्या दिलेल्या अटींत फेरफार करण्यांत आलेला आहे. कोणत्याही धंद्यानें संरक्षण किंवा मदत मागतांना तो (१) भक्कम व्यापारावर चालू आहे व (२) त्यास मिळणाऱ्या नैसर्गिक अथवा आर्थिक फायद्यामुळें त्याची जलदगतीनें वाढ होणें सोपें जाऊन अखेरीस तो सरकारी संरक्षण वा मदत दिल्याशिवाय चालू राहील अथवा राष्ट्रहिताचे दृष्टीनें त्यास संरक्षण देणें इष्ट आहे एवढ्याच अटी पुऱ्या कराव्या लागतात.

चौकशीच्या विषयांचा विचार करतां बोर्डानें देशाचें औद्योगीकरण जलद गतीनें होण्यास शक्य तेवढें प्रोत्साहन देऊन तें वाढीस लावण्याचें सरकारनें जाहीर केलेलें औद्योगिक धोरण, आपल्यापुढें ठेवलें आहे. राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ करून संरक्षणाचे दृष्टीनें देशाची अधिक तयारी करणें व रोजगाराची उच्च व स्थिर पातळी यांसाठीं सरकारनें हें धोरण स्वीकारलें होतें. त्याशिवाय युद्धकाळांतील धंद्यांस संरक्षण वा मदत देण्याची मागणी अजमावतांना बोर्डानें यांतील बहुतेक सर्व धंदे संरक्षणाच्या गरजा भागविण्यासाठीं अगर मुलकी लोकवस्तीसाठीं आवश्यक अशा वस्तूंचा पुरवठा करतांना आलेली टंचाई भरून काढण्यासाठीं घाईघाईनें उभारण्यांत आलें होते ही गोष्ट जमेस धरली आहे. तसेच नवीन औद्योगिक गटांनीं वापरलेली यंत्रसामुग्री बहुतेक जुनी होती. सुटे भाग, कच्चा माल व तांत्रिक माणसें ह्यांचा पुरवठा अपुरा होता. नेमण्यांत आलेले कामगार शिक्षण न घेतलेले व बिनवाकबगार होते. कच्च्या मालाच्या व तयार मालाच्या वाहतुकींत विलंब, अनियमितपणा व अनिश्चितता होती. भरमसाट चलनवाढ होणाऱ्या गोष्टी घडून कारखानदारांस उत्पादन खर्च कमी ठेवण्याचे कामीं अतिशय कठीण जात होतें. ह्या सर्व गोष्टींचाही बोर्डानें नीट विचार केला आहे. हे अडथळे ध्यानांत घेऊन संबंधित धंदा योग्य कार्यक्षमतेनें चालविला जात आहे अगर नाहीं याची बोर्डानें चौकशी केली. देशांतील परिस्थिति बऱ्याच अंशीं नेहमींची स्थिर झाल्यावर संरक्षित धंद्यांस पुढें संरक्षण चालू ठेवतांना त्या मागणीची अधिक कडक तपासणी करण्याची निश्चित कल्पनाही त्याचवेळीं बोर्डापुढें होती.

या कामाचे जोडीस या बोर्डाकडे ऑस्ट्रेलिया, अमेरिका व कॅनडा या देशांतील बोर्डाप्रमाणें आणखी कांहीं महत्त्वाचीं कामें सोपविण्यांत आलीं होतीं. देशांतील उत्पादित वस्तूंच्या खर्चाची चौकशी करून त्यांच्या किंमती ठरविण्याचें काम बोर्डाकडे सोपविण्यांत आलें होतें. पूर्वी हें काम कमॉडिटी प्राईसेस बोर्डाकडे होते. संरक्षित जकात वा मदतीचे इतर उपाय यांच्या परिणामासंबंधी चौकशी करून संरक्षित धंद्यांच्या होणाऱ्या प्रगतीवर सतत नजर ठेवणें व देण्यांत आलेली अशा प्रकारची मदत व संरक्षक जकात यांत फरक करावा किंवा नाहीं याच्या आवश्यकतेवर सरकारला सल्ला देणें, संरक्षण देतांना ठरविण्यांत आलेल्या अटींची सर्वस्वीं अंमलबजावणी होत आहे अगर नाहीं हें पाहाणें आणि संरक्षित धंदे कार्यक्षम रीत्या चालू आहेतना हें पाहाणें, इत्यादि महत्त्वाचीं कामेंही बोर्डाकडे देण्यांत आलीं होतीं.

त्याचप्रमाणें वस्तूंच्या मूळ किंमतीच्या प्रमाणांतील व विशिष्ट जकात, निरनिराळ्या वस्तूंचें जकातविषयक मूल्यमापन व इतर देशांस दिलेल्या जकातविषयक सवलतींचे परिणाम यांचा अभ्यास करणें, उत्पादनास खीळ घालून किंमती कायम ठेवून अगर वाढवून संयुक्त व्यापारी संस्था व मक्ते ट्रस्टस व व्यापारावरील इतर निर्बंध संरक्षण मिळणाऱ्या धंद्यावर काय परिणाम करतात त्याचा अहवाल देणें व अशा गोष्टी होऊं न देण्यासाठीं मार्ग व उपाययोजना सुचविणें हीं कामें बोर्डास करावीं लागलीं.

औद्योगिक धोरणासंबंधीं एप्रील १९४८ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आलेल्या पत्रकांतील ७ व्या परिच्छेदांत नमूद केलेल्या मोटारी, ट्रॅक्टर, मीठ, इलेक्ट्रिक इंजिनियरींग व सीमेंट यांसारख्या सुरवातीला बरेंच भांडवल लागणाऱ्या अथवा मध्यवर्ती नियोजन व नियमन लागणाऱ्या मूलभूत धंद्यांस संरक्षण वा मदत देण्याच्या मागणीचा ३ नोव्हेंबर १९४९ च्या ठरावानुसार युद्धकाळांतील धंद्यांच्या मागणीप्रमाणेंच विचार करण्यांत यावा असें भारत सरकारनें १९४८ मध्यें ठरविलें.

त्याचप्रमाणें धंद्यांना दिलेलें संरक्षण अथवा मदत यांमध्यें फेरबदल करण्याची आवश्यकता आहे किंवा नाहीं हें ठरविण्याच्या दृष्टीनें संरक्षित धंद्यांची पहाणी करण्याचें काम बोर्डास अधिक त्वरेनें करतां यावें म्हणून आयात केलेल्या वस्तूंच्या सी. आय. एफ्. किंमतींतील उतारामुळें जकातींत वाढ करण्याबद्दलचे अर्ज थेट स्वीकारण्याचा अधिकार देण्यांत आला. इंडियन टॅरिफ ॲक्टच्या ४ (१) कलमानुसार हे अर्ज सरकारकडे करण्यांत येत असत.

(अपूर्ण)

### अमेरिकेंतील कंपन्या

अमेरिकन सरकारच्या व्यापारी खात्यानुसार, अमेरिकन व्यापारउदीम हा लहान लहान कंपन्यांचा बनला असुन, १९४८ च्या मार्चमध्यें तर अमेरिकेंतील तीन चतुर्थांश कंपन्यांत चार-पेक्षांहि कमी नोकरवर्ग होता. यापैकीं बऱ्याचशा कंपन्यांत तर मुळीं नोकरच नव्हते. बहुंशीं एकाच माणसाची अथवा कौटुंबिक व्यवसायासारखी ही तथाकथित कंपनी असे.

एक टक्क्यापेक्षांहि कमी कंपन्यांत १०० वर नोकर होते. राष्ट्राच्या एकूण ३९,६६,८०० कंपन्यांपैकीं फक्त ३,१०० कंपन्यांच्या वेतनखतावर १००० नोकरांची नोंद होती. व्यापारी खात्यानें या संबंधांत पुढीलप्रमाणें आंकडेवारी दिली आहे. ७४.५ टक्के कंपन्यांत ४ पेक्षां कमी नोकर; १२.८ टक्के कंपन्यांत ४ ते ७ नोकर; ७.८ कंपन्यांत ८ ते १९ नोकर; ३ टक्के कंपन्यांत २० ते ४९ नोकर; १ टक्के कंपन्यांत ५० ते ९९ नोकर; ०.७ टक्के कंपन्यांत १०० ते ४९९ नोकर; ०.१ टक्के कंपन्यांत ५०० ते ९९९ नोकर व ०.१ टक्के कंपन्यांत १००० किंवा त्याहून अधिक नोकर.

---

### चीनमधील पुराचा बंदोबस्त

चीनमधील व्हाई-हो ह्या नदीला पूर येऊन आसपासच्या शेतांचें फार नुकसान होतें. ह्या नदीची लांबी ४०० मैल आहे व तिला अनेक उप-नद्याहि मिळतात. ठिकठिकाणीं धरणें बांधून नदीच्या पाण्याचा उपयोग शेतीला करण्याची एक योजना चिनी सरकारनें आंखली आहे. उगमाच्या बाजूला पाणी सांठविण्यासाठी धरणें बांधण्यांत येणार आहेत. ह्याशिवाय मुखाच्या बाजूलाही धरणें बांधण्याचें ठरलें आहे.

### चिनी शेतकऱ्यांकरतां नवें पंचांग

चिनी शेतकऱ्याला उपयोगी पडावें म्हणून एक नवें पंचांग पोकिंग येथील संशोधन संस्थेनें तयार केलें आहे. शेतांत बीं पेरणें, घरें बांधणें, प्रवासाला निघणें, विवाह वा अंत्य संस्कार इ. कार्यांसाठी मुहूर्त पहाण्याची चिनी शेतकऱ्यांची पद्धत आहे. ह्या नव्या पंचांगांत अक्षरें कशीं काढावीं, खेळ कसे कसे खेळावे इ. माहितीहि देण्यांत आली आहे.

### सोमनाथाच्या देवळांतील पिंडी

ता. ७ मार्च १९५१ ह्या दिवशीं महाशिवरात्र येते. त्या दिवशीं सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या हस्तें इतिहासप्रसिद्ध सोमनाथाच्या देवालयांत नवीन शंकराच्या पिंडीची प्राणप्रतिष्ठा करण्याचें ठरलें आहे.

### इंडोनेशिआंत हिंदी बँक


युनायटेड कमार्शिअल बँक ह्या बँकेनें जाकार्ता येथें आपली शाखा उघडण्याचें ठरविलें आहे. भारताचे एक व्यापारी मंडळ नुकतेंच इंडोनेशिआला जाऊन आलें. त्याच वेळीं बँकेचें जनरल मॅनेजरनीं शाखेसंबंधीं जरूर ती व्यवस्था केली.

### नैसर्गिक रबराच्या वापरावर निर्बंध

टायर व रबर कंपन्यांनी आपल्या नैसर्गिक रबराच्या वापरांत २५ टक्के कपात करावी असा हुकूम अमेरिकन सरकारनें काढला आहे. ३० जुलै १९५० रोजीं पुऱ्या झालेल्या १२ महिन्यांत ह्या कंपन्या दर महिना जितकें रबर सरासरी वापरीत होत्या त्याच्या ७५ टक्केच आतां त्यांनी वापरावयाचें आहे. नैसर्गिक रबराचा वापर कमी करून त्याच्या ऐवजीं कृत्रिम रबर वापरण्यांत येणार आहे. युद्धसामुग्री तयार करण्यासाठीं जरूर असलेला कच्चा माल सांठवून ठेवण्याच्या अमेरिकेच्या धोरणाचा हा परिणाम आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

Dr. WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER

रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.

जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.
पेडणेकर आणि कं. लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.
तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८






### वेस्टर्न इंडियाच्या पुणें जिल्हा एजंटांचें वार्षिक संमेलन

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि. सातारा, या कंपनीच्या पुणें शाखा कचेरींतील एजंट मंडळींचें वार्षिक संमेलन कंपनीचे एजन्सी मॅनेजर, श्री. ल. वि. काशीकर, एम. ए. यांचे अध्यक्षतेखालीं रविवार दि. २९-१०-५० रोजीं युनायटेड वेस्टर्न बँकेच्या कचेरींत सायंकाळीं झालें.

पुणें शाखाधिकारी श्री. कृ.ग. मांडकर, एम. ए. यांचें स्वागत-पर प्रास्ताविक भाषण झालें. त्यांनीं आपले भाषणांत कंपनीच्या व पुणें शाखेच्या गतवर्षीच्या कामाचा आढावा घेऊन नवीन दुरुस्त विमा कायद्यांतील एजंटांशीं संबंधित असणाऱ्या कलमांचें यथासांग विवेचन केलें आणि गतवर्षी जिल्ह्यांत उत्कृष्ट काम करणाऱ्या एजंट मंडळींचा गौरव करून स्वखर्चानें त्यांस बक्षिसें जाहीर केलीं.

यानंतर एजंट मंडळींपैकीं श्री. तांबे यांनीं कंपनी व शाखा-कचेरीकडून एजंटांस वेळोवेळी जें साह्य व मार्गदर्शन मिळतें त्या-बद्दल कृतज्ञतापूर्वक विवेचन केलें. तदनन्तर अध्यक्ष, कंपनीचे एजन्सी मॅनेजर श्री. काशीकर, यांनीं सुमारें १ तासभर नवीन विमा कायद्याचें विमा कंपन्यांचे दृष्टीनें परीक्षण करून कायद्या-पूर्वीपासूनच वेस्टर्न इंडियानें काटकसरीनें आणि दूरदर्शीपणानें कायद्यांतील निर्बंध आपणहून पाळून घेण्याचे धोरणानें कारभार केल्यामुळें वेस्टर्न इंडिया भरभक्कम आर्थिक पायावर कशी उभी आहे याचें विवेचन केलें. तसेंच, विमाशास्त्राच्या मूलभूत कल्पना, विमा विक्रयासंबंधाचे सिद्धांत व याबाबतचे आपले अनुभव सांगून एजंट मंडळीस मार्गदर्शन केलें.

---

### बेळगांव बँकेच्या शाखाधिकाऱ्यांचें स्नेह संमेलन

दि बेळगांव बँक लिमिटेड, बेळगांव, या बँकेच्या सर्व शाखा-धिकाऱ्यांचें ४ थें वार्षिक स्नेहसंमेलन, त्याच्या निपाणी शाखेच्या ऑफिसमध्यें रविवार ता. २२-१०-१९५० रोजीं भरलें होतें. त्या-समयीं बँकेचे सर्व डायरेक्टर्सही हजर होते. सदरहू संमेलन यशस्वी-रीत्या पार पडलें. त्यांत बँकेच्या एकंदर कामकाजाचा आढावा घेण्यांत आला व पुढील वर्षाच्या कामाची रूपरेषाहि, बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्यातर्फे बँकेचे अध्यक्ष श्री. गोविंदराव सराफ यांनीं, सर्व शाखाधिकाऱ्यांना समजावून सांगितली.

त्यानंतर शाखाधिकाऱ्यांच्या शंकांचा व सूचनांचा योग्य तो परामर्श घेण्यांत आला. दुसरे दिवशीं म्हणजे ता. २३-१०-१९५० रोजीं सकाळीं स्थानिक व्यापाऱ्यांची सभा घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजावून घेण्यांत आल्या व पानसुपारीनंतर हा समारंभ संपला.

अशा प्रकारच्या स्नेहसंमेलनामुळें बँकेचे गिऱ्हाईक, नोकरवर्ग व कार्यकारी मंडळ यांचा घनिष्ट संबंध येऊन, बँकेची उत्तरोत्तर प्रगति होण्यास मदत होते.

---

### लोखंडाच्या पुरवठ्याची योजना

आयर्न सप्लाय स्कीमप्रमाणें लोखंड विकत घेण्यासाठीं मुंबई सरकारनें जीं कर्जें दिलीं असतील त्यांवर व्याज घेण्यांत येऊं नये असा हुकूम काढण्यांत आला आहे. ही योजना १९४४ पासून अमलांत आली असून नवीन हुकुमाची अंमलबजावणी तेव्हांपासून करण्यांत येणार आहे.

---

### संयुक्त प्रांतांतील गुळाचा धंदा

संयुक्तप्रांत सरकारने प्रांतांतील गुळाच्या धंद्याचा विकास करण्याची योजना आंखली असून ती चांगली प्रगत होत आहे. शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करून उत्तम प्रतीचा गूळ तयार कसा करावा याचें शिक्षण शेतकऱ्यांना देण्यांत येत आहे. कानपूर येथें १८ निरनिराळ्या जिल्ह्यांतून घेतलेल्या ५० शेतकऱ्यांना शिक्षण दिलें जात आहे. यापूर्वी बऱ्याच शेतकऱ्यांनीं शिक्षण पूर्ण केलें असून ते नवीन पद्धतीच्या कोल्हूचा उपयोग करून पूर्वीपेक्षा अधिक गुळाचें उत्पादन करीत आहेत. संयुक्त प्रांतांत गुळाच्या धंद्याला अधिक वाव आहे असें सरकारचें मत आहे. संयुक्त प्रांतांतील गुळाच्या धंद्यांत १५,००,००० रु. भांडवल गुंतलेलें आहे. साखरेच्या धंद्यांत गुंतलेलें भांडवल सुमारें ३३,००,००,००० रु. आहे. प्रांतांतील गुऱ्हाळांतून दरवर्षी अंदाजें ४८,००,००,००० मण ऊंस गाळला जातो. आणि त्यापासून १०८ कोटी रु. किंमतीचा गूळ तयार होतो. गुळाच्या धंद्यांत १२,००,००० कामगार गुंतलेले आहेत. प्रांतांतील साखरेच्या कारखान्यांनीं गेल्या वर्षी अंदाजें १६,००,००,००० मण ऊंस गाळला. व १६,५००० मण साखर तयार केली. ह्या साखरेची किंमत ४७,०२,५०,००० रु. भरते. कारखान्यांतून काम करणाऱ्या मजुरांची संख्या १,३३,००० आहे.

सरकारनें आंखलेल्या योजनेप्रमाणें नवीन चरक आणि सुधारलेल्या भट्ट्या यांच्या साहाय्यानें गुळाचें उत्पादन बरेंच वाढवितां येईल.

---

### रेस कोर्स चालविणाऱ्या क्लबांतील पशुवैद्य

भारतांतील टर्फ क्लब हे इंग्लंडमधील (एम. आर. सी. व्ही. एस.) (रॉयल कॉलेज ऑफ व्हेटरिनरी सर्जन्सचे सभासद) सर्टिफिकिटें मान्य करतात, परंतु हिंदी पशुवैद्यकीच्या कॉलेजांतील पदवी-धरांची सर्टिफिकेटें मानीत नाहींत व त्यांना हिणकस लेखतात. ही गोष्ट ऑल इंडिया व्हेटरिनरी असोशिएशननें भारत सरकारच्या नजरेस जाणून दिली व हिंदी पदव्यांचा हा अपमान दूर करावा अशी त्यास विनंती केली आहे टर्फ क्लब हे भारतीयांच्या पैशावरच चालत असतांना, भारतीयांच्याच अपमानाचें हें वैगुण्य अद्याप कायम रहावें हें योग्य नाहीं ही गोष्ट भारत सरकारास पटली आहे. राज्य सरकारें टर्फ क्लबांना परवाने देतात, त्यांनीं ही तफावत दूर करावी, असें त्यांना भारत सरकारनें सुचविलें आहे.

---

### बँक ट्रायब्यूनल अवार्डविरुद्ध आणखी अर्ज

हाँगकाँग अॅण्ड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशननें बँकिंग ट्रायब्यूनल-च्या निवाड्याविरुद्ध अर्ज केला आहे. हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं ट्रायब्यूनलनें बैठकी भरवल्या, आणि त्यांपैकीं कित्येक वेळीं ट्रायब्यूनलचा हा नाहीं तर तो सभासद उपस्थित नव्हता. अशा तऱ्हेनें बैठकी भरविणें इंडस्ट्रियल डिस्प्यूट्स अॅक्टच्या विरुद्ध आहे आणि न्यायाविषयक नैसर्गिक तत्त्वांसहि सोडून आहे, असा बँकेचा दावा आहे. १९४७-४८ व १९४८-४९ सालांसाठीं बँकेच्या नोकरवर्गानें कमाल चार महिन्यांच्या बोनसची मागणी केली असतांना, अवार्डप्रमाणें बँकेस २० महिन्यांच्या पगाराइतका बोनस द्यावा लागणार आहे.

---

पो. बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. १४८३

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें.

## लक्ष्मी रोड, पुणें २.

भोर, पौंड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज, ठेवी स्वीकारल्या जातात.
एक वर्ष व दोन वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.
एक वर्ष मुदतीस दीड टक्का.
दोन वर्षें अगर जास्त मुदतीस दोन टक्के.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडी (सीलबंद पेट्या) चा व्यवहार सुरू आहे. सर्वांनीं त्याचा फायदा घ्यावा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

## एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)
स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

*—यथायत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर

दी
# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

*[कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.]*

स्थापनाः १९१६.
मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.
तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०९,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहूपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-फोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. प. सावंत, जनरल मॅनेजर.

### विहिरी खणल्या पण वाया गेल्या

आसाम ऑईल कंपनीनें आसामच्या शिवसागर जिल्ह्यांत तेलासाठी कांहीं विहिरी खोदल्या होत्या. परंतु त्या परवडण्यासारख्या नसल्यामुळें आतां अधिक खोल करण्यांत येणार नाहींत. या विहिरी बर्मा ऑईल कंपनीतर्फे खोदण्यांत येत होत्या. ७,१०० फूट खोल खणल्यावरही विहिरींतून खारें पाणीच निघूं लागलें. पाण्यांत तेलाचा अंश फार थोडा होता. या अनुभवाचा फायदा बारसिल्ला भागांतील विहिरींबाबत घेण्यांत येणार आहे.

### कारखान्यांतील कामगारांची कपात

कारखान्यांतून करण्यांत येणाऱ्या कामगारांच्या कपातीवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार देणारें एक बिल भारत सरकार तयार करीत आहे असें समजतें. ह्या बिलाप्रमाणें कामाच्या मानानें जादा असणारे कामगार काढून टाकण्यांत आले तर तो प्रश्न कोर्टाकडे धाडतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें कारखान्याची पुनर्घटना करण्यांत आल्यावर कमी करण्यांत आलेले कामगार 'कपाती' खालीं धरतां येणार नाहींत.

### चहाच्या मळ्यांचें फारसें नुकसान झालें नाहीं.

आसाममधील भूकंपामुळें चहाच्या मळ्यांचें फारसें नुकसान झालें नाहीं असें समजतें. एकूण नुकसान ६५ लाखांच्या घरांत गेलें असलें तरी चहाच्या एकूण पिकाच्या १ टक्का पिकालाच धक्का बसला आहे. आसाममधील इतर कांहीं उद्योगधंद्यांचें मात्र अधिक नुकसान झालें आहे.

### इंडियन सायन्स कॉंग्रेस

बंगलोर येथील इंडिअन इन्स्टिटयूट आफ सायन्सच्या विद्यमानें इंडिअन सायन्स कॉंग्रेसचें ३८ वें अधिवेशन ता. २ जानेवारी १९५१ रोजीं भरणार आहे. अधिवेशनाचें अध्यक्षस्थान प्रो. जे. एच. भाभा ह्यांनीं स्वीकारलें असून, अधिवेशन एक आठवडा चालेल.

### कोरडें बी. सी. जी. औषध

फ्रान्समधील पॅश्चूर इंस्टिट्यूटमधील डॉ. डेल्यूज ह्यांनीं क्षयरोगावरील बी. सी. जी. हें औषध कोरड्या अवस्थेंत ठेवण्यांत यश मिळविलें आहे. ह्या अवस्थेंत औषध एक वर्षभर कार्यक्षम रहातें. मामुली बी. सी. जी. हें औषध तयार झाल्यापासून पंधरवड्यांत टोचावें लागतें; नाहीं तर तें निरुपयोगी होतें. ह्या शोधामुळें बी. सी. जी. आतां दूरच्या देशांनाही उपलब्ध होऊं शकेल.

### जागतिक बँकेचें तुर्कस्तानला कर्ज

तुर्कस्तानच्या औद्योगिक विकासाच्या कार्यक्रमासाठी ९० लाख डॉलर्सचें कर्ज देण्याचें इंटरनॅशनल बँकेनें ठरविलें आहे. तुर्कस्तानांतील खाजगी भांडवलवाले औद्योगिक विकासासाठी जें साहित्य मागवितील त्याच्या आयातीसाठी या कर्जाचा उपयोग करण्यांत येणार आहे.

### मध्यप्रांतांत कोळशाच्या व बॉक्साइटच्या खाणी

मध्यप्रांतांतील कोरबा भागांत कोळशाच्या आणि अल्युमिनिअमच्या मातीच्या खाणी सांपडल्या आहेत. कोळशाच्या खाणीचें क्षेत्रफळ सुमारें २०० चौरस मैलाचें आहे. ह्या खाणींतून ६०,००,००० टन कोळसा निघूं शकेल असा अंदाज आहे. ह्या भागांत उभारल्या जाणाऱ्या लोखंड व पोलादाच्या कारखान्याला नव्या खाणीचा चांगला उपयोग होईल. बॉक्साइटच्या खाणी कोळशाच्या खाणींच्या उत्तरेला १५ ते २० मैलांवर आहेत.

### ऑस्ट्रिया–पाकिस्तान करार

ऑस्ट्रिया आणि पाकिस्तान ह्या दोन देशांच्या दरम्यान गेल्या जुलै महिन्यामध्यें एक व्यापारी करार झाला होता. ह्या कराराला आतां उभय सरकारांची मान्यता मिळाली आहे. या कराराच्या अटीप्रमाणें पाकिस्तान ऑस्ट्रियाला ६,५०० टन ताग, १०,००० टन गहूं आणि २,००७ टन कापूस पुरविणार आहे. ऑस्ट्रिया पाकिस्तानला कापसाचें व लोकरीचें कापड, लोखंड, पोलाद व यंत्रसामुग्री इत्यादि माल पुरविणार आहे.

### रशिआचें औद्योगिक उत्पादन

१९५० च्या पहिल्या नियोजित कार्यक्रमांत ठरविण्यांत आलेल्या औद्योगिक उत्पादनापेक्षां ३ टक्के उत्पादन अधिक झालें. कांहीं औद्योगिक खातीं मात्र कार्यक्रमांतील आंकड्यांच्या मागें आहेत. उदा. लांकूड आणि कागद. ह्या धंद्यानें ठराविक उत्पादनाच्या ९५ टक्केच उत्पादन केलें आहे. परंतु कोळसा, तेल, रसायनें, वीज इ. सरकारी खात्यांनीं आपल्या ठरलेल्या आंकड्यांपेक्षां कांहीं थोडे टक्के जास्त उत्पादन केलें आहे.

### एका अणुबॉंबनें किती माणसें मारतात

न्यूयॉर्क शहरांत अणुबॉंबचा स्फोट झाल्यास १,६०,००० माणसें जायबंदी होतील व त्यांपैकीं निम्मी मरतील असा अंदाज करण्यांत आला आहे. जखमी लोकांची व्यवस्था करण्यासाठी सध्याच्यापेक्षा तीन ते पांचपट डॉक्टर्स अधिक लागतील.

### कुशल कामगारांची परदेशी पाठवणी ?

अमेरिकेच्या युरोपीय आर्थिक संस्थेनें कुशल जर्मन कामगारांना परदेशी पाठविण्याच्या एका योजनेचा विचार चालविला आहे. ह्या योजनेप्रमाणें ज्या देशांना जर्मनीच्या कुशल कामगारांची जरूर आहे अशा देशांना सुमारें २०,००० जर्मन कामगार त्यांनीं चालविण्याच्या यंत्रासहित पुरविण्यांत यावयाचे आहेत. हे सर्व कामगार पश्चिम जर्मनींतूनच मिळविण्यांत यावयाचे आहेत.

### 'फ्लाईंग राणी' पुन्हां धांवणार.

बॉंबे सेंट्रल ते सुरत ह्या मार्गावर 'फ्लाईंग राणी' ही गाडी १ नोव्हेंबर १९५० पासून पुन्हां धावूं लागली आहे. ही गाडी दक्षिण गुजरातेंत युद्धापूर्वी फार लोकप्रिय झाली होती.

### ऑडिट ब्यूरो ऑफ सर्क्युलेशन्स

ह्या संस्थेची सर्व साधारण वार्षिक सभा श्री. जैनी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १६ आक्टोबर रोजीं भरली होती. भारतांतील जीं वृत्तपत्रें अगर नियतकालिकें संस्थेची सभासद आहेत, त्यांच्या खपाचे आंकडे आतां मिळूं शकतील. संस्थेच्या नव्या कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून 'सकाळ' चे डॉ. एन. बी. परुळेकर ह्यांची निवडणूक झाली आहे.

### सीलोनमधील नौकऱ्यांत भारतीयांना प्रतिबंध

सीलोन सरकारनें भारतीय नागरिकांना नौकऱ्या न देण्याबाबत व्यापारी संस्थांना पुढील प्रमाणें सूचना केल्या आहेत. १ नोव्हेंबर १९५० नंतर व्यापारी संस्थांनी कोणत्याही हिंदी नागरिकाला कामावर ठेवूं नये. १९४७मध्यें सीलोनचे मुख्य प्रधान व पं. नेहरू ह्यांच्यांत ह्या विषयासंबंधीं बोलणी झालीं होतीं. ह्या बोलण्यानंतर ज्या भारतीयांना नौकरीवर घेण्यांत आलें असेल त्यांच्या जागीं सीलोनच्या नागरिकांना घेण्यांत यावें; आणि जे नागरिक जन्मानें सीलोनचे नागरिक असतील, त्यांना केवळ नोंदीनें नागरिकत्व घेतलेल्यांच्या आधी नोकरी देण्यांत यावी, असें तेथील सरकारचें धोरण आहे.

# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक,
बी. एस्सी., बी. ई., एलएल. बी.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवीवर व्याज—
चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षें ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिसः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.



# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. वृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.



# दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७

हेड ऑफिसः—हायस्कूल रोड, सांगली.

शाखाः—१ जत, २ मिरज.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें ,, | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चे वर. |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

सरकारतर्फेः—

मे. भ. अं. दप्तरदार, B. A., चेअरमन.
मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सातारा.
मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.
मे. ज. वि. करमरकर, सराफ.

सोसायट्यांतर्फेः—

मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.
मे. हिं. म. पाटील.
मे. रा. म. पाटील.

वैयक्तिक सभासदांतर्फेः—

मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
मे. सु. आ. पाटील.

करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बा. पां. ठाणेदार, मॅनेजर. — भ. अं. दप्तरदार, बी. ए. चेअरमन.



( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली मागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

**—मिरज—**

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. — के. डी. शिराळकर मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.